शांतिलाल मुथ्था फाउंडेशन

कोविड काळात ऑनलाईन सोयीशिवाय देखील
आपल्या मुलांचे शिक्षण सुरू ठेवूया!!

# सहयोगी शिक्षण अभियान

## अंतर्गत

# समाज विद्या केंद्र

सुरु करण्यासाठी शांतिलाल मुथ्था फाउंडेशनचे
सर्व सरपंचांना आवाहन



**महाराष्ट्रातील सरपंच बंधू-भगिनींना नमस्कार!**

***विषय तसा गंभीर आहे, पण आपलं गावही खूप खंबीर आहे!***

लॉकडाऊनमुळे शाळा बंद असल्याने मुलांच्या शिक्षणात खंड पडला आहे. त्यामुळे मुलांवर भावनिक, मानसिक, शारीरिक आणि सामाजिक अशा विविध अंगांनी खूपच परिणाम झाले आहेत. यावर वेळीच उपाययोजना केल्या नाहीत, तर मुलांचे शिक्षणातील स्वारस्य कमी होऊन शाळा गळतीचे प्रमाण अधिकच वाढण्याची संभावना आहे. त्याशिवाय मुलांच्या मनावर याचा दूरगामी परिणाम होण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्र शासनान ऑनलाईन शिक्षणाच्या माध्यमातून या समस्या सोडवण्यासाठी पुढाकार घेतलेला आहे, पण ५०% मुलांकडे सुविधा नसल्याने त्यांना याचा फायदा होत नाही. आपल्या गावात ऑनलाईन शिक्षणासाठी इंटरनेट आणि संगणक अशा सोयी कदाचित नसतील. अशा स्थितीत मुलांचा शिक्षणाशी संपर्क तुटता कामा नये, ही तुमची आणि आमचीही भावना आहे.

अशा परिस्थितीत मुलांना शिक्षणप्रक्रियेमध्ये गुंतवून ठेवणे आणि विस्कळीत झालेली शैक्षणिक परिस्थिती पूर्ववत करणे अत्यंत आव्हानात्मक आहे. या अनुषंगाने शांतिलाल मुथ्था फाउंडेशनने सहयोगी शिक्षण अभियानाची रचना केली आहे. गावचे सरपंच व पालक मिळून हे अभियान राबविणार आहेत. यात ग्रामीण भागातील प्राथमिक इयत्तेतील मुलांच्या शिक्षणात पडलेला खंड भरून काढण्यासाठी, गावातील समुदाय आणि पालक एकत्रितपणे त्यांच्या गावात समाज विद्या केंद्र स्थापित करून, मुलांचे शिक्षण सुरू करण्यासाठीचे एक नवीन मॉडेल विकसित केले आहे. सध्या ज्या ठिकाणी कोरोनाचा प्रार्दूभाव कमी आहे अशा गावात कोरोनासंबंधातील सर्व नियमांचे पालन करून समाज विद्या केंद्रांची सुरूवात होईल.

## ‘समाज विद्या केंद्र’ चालविण्यासाठी गावाचा पुढाकार

- सुरूवातीला सरपंच गावाची लेखी संमती घेतील.
- गावातील किमान दहावी उत्तीर्ण उत्साही स्वयंसेवक (शिक्षण सारथी) हा कार्यक्रम चालवण्यास पुढे येतील.
- हे शिक्षण सारथी समाज विद्या केंद्रासाठी सुरक्षित जागा निवडतील.
- त्या ठिकाणी इयत्ता पाचवीपर्यंतची इच्छा असणारी मुले पालकांच्या लेखी परवानगीने प्रवेश घेतील.
- कोरोना काळातील आरोग्याचे नियम पाळून गप्पा, गाणी, खेळ, गोष्टी सांगणे आणि ऐकणे, मुलांच्या रोजच्या जीवनातल्या प्रसंगावर चर्चा, संभाषणाचा सराव, परिसरातील साहित्य वापरून कलेचे व हस्तव्यवसायाचे सोपे उपक्रम अशा मुलांच्या आवडीच्या आणि शाळेच्या अभ्यासक्रमातील गोष्टी शिकवल्या जातील.



## शांतिलाल मुथ्था फाउंडेशनची भूमिका

- तज्ज्ञांच्या मदतीने आणि संशोधनाचा आधार घेऊन मुलांना शिकविण्यासाठी अभ्यासक्रमाची रचना केली आहे.
- अभ्यासक्रम मुलांपर्यंत कसा पोहोचवावा याचे प्रशिक्षण सारथींना ऑनलाईन स्वरूपात दिले जाईल.
- हे शैक्षणिक साहित्य इंटरनेट नसले तरी मोबाईल ॲपवर पाहता आणि वापरता यावे यासाठी ॲपची निर्मिती केली आहे.
- फाउंडेशनचे प्रतिनिधी तुमच्या आणि शिक्षण सारथींच्या नियमित संपर्कात राहून गरजेनुसार सहाय्य करतील.

## समाज विद्या केंद्राचे फायदे

- मुलांना आनंद मिळेल आणि अभ्यासाची सवय राहील.
- मुलांना आपल्या मित्र-मैत्रिणींबरोबर एकत्र खेळण्याचा, गप्पा-गोष्टी करण्याचा आनंद घेता येईल आणि सामाजिक कौशल्येही विकसित होतील.
- मुलांचे मन स्थिर व्हायला मदत होईल.
- स्वतःची आणि इतरांची काळजी कशी घ्यायची हे समजेल.
- गावातील लोकांची मुलांच्या शिक्षणामध्ये रुची निर्माण होईल. तसेच मुलांना हाताळण्याविषयीची काही मुलभूत कौशल्ये त्यांच्यात विकसित होऊ शकतील.





# शांतिलाल मुथ्था फाउंडेशनबद्दल

शांतिलाल मुथ्था फाउंडेशन ही एक स्वयंसेवी संस्था आहे. भारतातील शालेय शिक्षणात योग्य ते बदल घडवून आणण्यासाठी सहाय्य करणे हा या संस्थेचा उद्देश आहे. लोकशाही अंगी रुजलेला, नागरिक घडविण्यासाठी मुलांमध्ये त्यांना रुचेल आणि पचेल अशा रीतीने भारतातील आणि बाहेरील तज्ज्ञांच्या विचार विनिमयाने मूल्यांची जोपासना करण्यासाठी 'मूल्यवर्धन' हा कार्यक्रम विकसित केला गेला.

गेल्या चार वर्षांपासून हा कार्यक्रम महाराष्ट्रातील जिल्हा परिषदेच्या सर्व शाळांमध्ये शासनाने शासकीय कार्यक्रम म्हणून राबविला आहे. मूल्यवर्धन हा कार्यक्रम शाळेतील अभ्यासक्रम तसेच शिकविण्याच्या पद्धती यांच्याशी जुळणारा आहे. त्यातील उपक्रम इतरही विषय शिकविण्यासाठी मार्गदर्शक आहेत.

**"बंधू-भगिनींनो, सध्याची परिस्थिती बघता,**
**मुलांना वेळीच साथ दिली तर ते उद्याचे चांगले नागरिक घडतील.**
**आता वेळ न दवडता गावात विचारविनिमय करा.**
**समाज विद्या केंद्र सुरू करायचे असा आपला निर्णय पक्का झाला की,**
**सविस्तर माहितीसाठी आमच्याशी संपर्क साधावा."**

## अधिक माहितीसाठी संपर्क

---

**संपर्क क्रमांक**

शांतिलाल मुथ्था फाउंडेशन, ८वा मजला, मुथ्था चेंबर्स-२,
सेनापती बापट मार्ग, पुणे-४११०१६. फोन नं. ०२० ६६०५००००
info@mutthafoundation.org | www.mutthafoundation.org